# आदेश

नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक:- ३ सप्टेंबर, १९९२.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६

क्रमांक:- टिपीएस २२८७/१०८१/सीआर-१८२/नवि-९:-

ज्याअर्थी, चंद्रपूर शहराची विकास योजना [ यापुढे "उक्त विकास योजना " असे उल्लेखिलेली ] महाराष्ट्र शासनाने नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचा निर्णय क्रमांक:टिपीएस २२७५/६३९/युडी-६ दि. ३.८.१९७६ अन्वये मंजूर झाली असून दि. १.१०.१९७६ पासून अंमलात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत शीट नं. १४, ब्लॉक क्र. ४८ बाबपेठ मधील ०.०२ हेक्टर जमिन आरक्षण क्र. ११४ "खुली जागा" म्हणून आरक्षित आहे,

आणि ज्याअर्थी, आरक्षण क्र. ११४ "खुली जागा" हे आरक्षण सार्वजनिक हिताच्या दृष्टिने आवश्यक नसल्याचे चंद्रपूर नगरपरिषदेची [ समुचित प्राधिकरणाची ] खात्री झाली आणि त्यांनी पत्र क्र. १०१९/९२, दि. ४.३.१९९२ व्दारे उक्त विकास योजनेतील आरक्षण क्र. ११४ "खुली जागा" हे आरक्षण वगळण्याबाबत शासनाच्या नगर विकास विभागाला विनंती केली आहे,

आणि ज्याअर्थी, योग्य ती चौकशी केल्यानंतर आरक्षण क्र. ११४, "खुली जागा" हे आरक्षण सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून उक्त सार्वजनिक प्रयोजनार्थ आवश्यक नाही अशी शासनाची खातरजमा झाली आहे,

आता म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम ५० उपकलम [२] आणि इतर प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन, शासन उक्त विकास योजनेतील आरक्षण क्र. ११४ "खुली जागा" वगळण्याच्या प्रस्तावाला मंजूरी देत आहे आणि त्याकरिता शासन नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिसूचना क्र. टिपीएस २२७५/६३९/नवि-६, दि. ३.८.१९७६ मध्ये पुढे दिल्याप्रमाणे नवीन दुरुस्ती करण्यांत येत आहे,

उक्त विकास योजनेस अंतिम मंजूरी देण्याबाबतच्या अधिसूचनेसोबतच्या फेरफारांच्या अनुसूचिमध्ये शेवटच्या नोंदीनंतर खाली दिलेली नवीन नोंद समाविष्ट करण्यांत यावी. ,

" चंद्रपूर शहराच्या विकास योजनेच्या भाग नकाशा क्र. टिपीओ-चंद्रपूर/टिपीव्ही-२/३६१९ वर अंजिरी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ११४ " खुली जागा" हे आरक्षण ~~महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये~~ वगळण्यांत येत आहे. "

टिप :- सदरचा भाग नकाशा चंद्रपूर नगरपरिषद कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत एक महिन्याच्या कालावधीसाठी नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

सिनकर १९९२

म. म. गोखले
कार्यासन अधिकारी

6/2

ORDER

Urban Development Department
Mantralaya, Bombay-400 032.

Dated the 3 rd September 1992.

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

No.TPS 2287/1081/CR-182/UD-9 .- Whereas, the Development Plan of Chandrapur, has been sanctioned vide Government in Urban Development and Public Health Department Resolution No.TPS-2275/639/UD-6, dated 3rd August, 1976 and has come into force with effect from 1.10.1976 (hereinafter referred to as "the said Development Plan");

And whereas, in the said Development Plan the land admeasurin about 0.02 hectares out of Sheet No.14, Block No.48, Dhanapeth in reserved as Site No.114 "Open Space";

And whereas, the Chandrapur Municipal Council, being the Appropriate Authority, is satisfied that, Site No.114 " Open Space " is not required for the Public purpose and has requested the State Government to delete the Site No.114 "Open Space" from the said Development Plan, vide its letter No.1019/92, dated 4th March 1992;

And whereas, Government after making necessary inquiries is satisfied that, the site No.114 "Open Space" is no longer necessary for the said public purpose in the public interest ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (2) of Section 50 of the Maharashtra Regional and Town Planning Act,1966 and all the powers enabling it in that behalf; Government hereby sanctions the proposal of deletion of Site No.114 "Open Space" from the said Development Plan and for that purpose amends the Government Notification No.TPS-2275/639/UD-6, dated 3rd August 1976 as follows viz :-

In the Government Notification, in the Schedule of modifications appended to the Notification sanctioning the said Development Plan, after the last entry, the following new entry shall be added, viz :-

" Site No.114 "Open Space" is deleted from the reservation as shown in mauve verge on the part plan of Development Plan of Chandrapur bearing No.DP-Chandrapur/TPV-2/3619".

Note :- The aforesaid part plan is kept open for inspection by the public during office hours during all working days in the Office of the Chandrapur Municipal Council, Chandrapur for a period of one month.

By order and in the name of Governor of Maharashtra,


M. V. GOKHALE,
Desk Officer.

PLAN NO. D.P. CHANDRAPUR / TPV-2/3619

# PART PLAN OF DEVELOPMENT PLAN OF CHANDRAPUR.
(SANCTIONED)

SCALE :— 1:4000

GOVT. SEAL




LEGEND

1 RESIDENTIAL
2 INDUSTRIAL
3 COMMERCIAL
4 OPEN SPACE
5 WATER BODIES
6 TRANSPORT & COMMUNICATION
7 MODIFICATION U/S 50 OF THE M.R. & T.P. ACT, 1966.

SANCTIONED UNDER GOVERNMENT NOTIFICATION URBAN DEVELOPMENT ------ DEPARTMENT NO. TPS-2287/1681/CR-182 UD-9 DATE- 3 SEPT. 92

SEAL HEAD OFFICE PUNE

sd/
TOWN PLANNER
HEAD OFFICE, PUNE

sd/-
(S. M. ANBHAIKAR)
JOINT SECRETARY
URBAN DEVELOPMENT DEPARTMENT
MANTRALAYA BOMBAY 400 032